आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

३१ मे २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यातल्या ५७ जागांसाठी उद्या मतदान
- गेल्या आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ८ पूर्णांक २ दशांश टक्के
- सलग दुसऱ्या वर्षी सर्वाधिक परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र पहिल्या स्थानी
- धर्मनिरपेक्ष जनता दलाचा खासदार प्रज्वल रेवण्णा ६ जूनपर्यंत विशेष तपास पथकाच्या कोठडीत

  **आणि**
- भारतीय मुष्टीयोद्धा निशांत देवचं पॅरिस ऑलिम्पिकमधलं स्थान निश्चित

**<><><><><>**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या एकंदर ५७ लोकसभा मतदारसंघांमध्ये उद्या मतदान होणार आहे. मतदानाची प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शकरीत्या पार पडावी यासाठी निवडणूक आयोगानं सर्व तयारी केली आहे. उष्णतेच्या लाटेचा विचार करता मतदारांना  आणि निवडणूक कर्मचाऱ्यांना त्रास होऊ नये यासाठी आवश्यक त्या सूचना निवडणूक अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

या सातव्या टप्प्यात पंजाब आणि उत्तर प्रदेशातल्या प्रत्येकी १३, बिहारमधल्या ८, ओदिशातल्या ६, हिमाचल प्रदेशातल्या ४, झारखंडमधल्या ३ आणि चंडीगडच्या एका जागेसाठी मतदान होणार आहे. तसंच ओदिशा विधानसभेच्या उर्वरित ४२ जागांसाठीचं मतदानही उद्या पार पडणार आहे. सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात होईल.

लोकसभा निवडणुकीच्या या शेवटच्या टप्प्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकुर, भाजपाचे ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद, काँग्रेसचे मनीष तिवारी, विक्रमादित्य सिंह, राष्ट्रीय जनता दलाच्या नेत्या मीसा भारती आणि तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी यांच्यासह अनेक दिग्गजांचं भविष्य मतपेटीत बंद होईल.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या काळात प्राप्तीकर विभागानं एक हजार १०० कोटी रुपयांची रक्कम आणि दागिने जप्त केले आहेत. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीवेळी ३९० कोटी रुपये जप्त केले होते. त्या तुलनेत हे प्रमाण १८२ टक्क्यांनी जास्त असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीमध्ये इंडिया आघाडीला भरघोस मताधिक्य मिळेल असा दावा काँग्रेसनं आज केला. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांशी बोलताना हा दावा केला. भारत जोडो न्याय यात्रेमुळे काँग्रेसचा निवडणूक प्रचार सकारात्मक झाला असून काँग्रेसनं ७७ दिवसात, आदर्श आचार संहिता भंग केल्याच्या ११७ तक्रारी निवडणूक आयोगाकडे नोंदवल्या परंतु आयोगानं यावर काहीही कारवाई केली नाही असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

देशाचा स्थिर मूल्याधारित जीडीपी वाढीचा दर २०२३- २४ या वर्षात ८ पूर्णांक २ दशांश टक्के राहिला. केंद्रसरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय़ाने आज जाहीर केलेल्या आकडेवारीत ही माहिती दिली

आहे. २०२२ – २३ या आर्थिक वर्षात हा दर ७ टक्के नोंदला गेला होता. २०२३-२४ या वर्षात स्थिर मूल्याधारित जीडीपी १७३ लाख कोटी रुपयांच्या वर जाईल असा अंदाज आहे. तर चालू मूल्याधारित जीडीपी २९५ लाख कोटी रुपयांच्या वर जाईल असा अंदाज आहे.

<><><><><>

सलग दुसऱ्या सर्वाधिक परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र पहिल्या स्थानी असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. गेल्या आर्थिक वर्षात महाराष्ट्रात १ लाख २५ हजार १०१ कोटी रुपयांची गुंतवणूक आली. गुजरातमध्ये गेलेल्या एकूण गुंतवणुकीच्या दुपटीपेक्षा अधिक तसंच गुजरात आणि कर्नाटकमध्ये गेलेल्या गुंतवणुकीपेक्षा अधिक ही गुंतवणूक असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. केंद्र सरकारच्या उद्योग आणि व्यापार प्रोत्साहन विभागानं ही आकडेवारी प्रसिद्ध केल्याचं फडणवीस म्हणाले.

२०२२-२३ या आर्थिक वर्षात एकूण १ लाख १८ हजार ४२२ कोटी रुपये परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात झाली होती.

<><><><><>

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आपले शंभर टन सोने ब्रिटनमधून भारतात परत आणलं आहे. याचा भारताच्या आर्थिक सार्वभौमत्वावर आणि जागतिक बाजारपेठेवर लक्षणीय परिणाम होईल. बहुतेक देश त्यांचे सोने बँक ऑफ इंग्लंड च्या तिजोरीत ठेवण्यासाठी शुल्क भरतात. या वर्षी ३१ मार्चपर्यंत रिझर्व्ह बँकेकडे एकूण ८२२ मेट्रिक टन सोने होतं.

**<><><><><>**

मतमोजणीच्या दिवशी ताज्या निकालांच्या बातम्या देण्यासाठी आकाशवाणी मुंबईचा प्रादेशिक वृत्त विभाग सकाळी ९ वाजल्यापासून निवडणूक विशेष बातमीपत्र प्रसारित करणार आहे. तसंच निकालांचं सर्वंकष विश्लेषण करणारा चर्चात्मक कार्यक्रम निवाडा जनतेचा सकाळी ९ वाजून पाच मिनिटांपासून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सादर करण्यात येईल.

**<><><><><>**

धर्मनिरपेक्ष जनता दल पक्षाचा खासदार प्रज्वल रेवण्णा याला लैंगिक शोषण प्रकरणी बंगळुरूच्या एका न्यायालयानं ६ जूनपर्यंत विशेष तपास पथकाची कोठडी सुनावली आहे. त्याला दररोज आपल्या वकिलाला भेटण्याची परवानगीही न्यायालयानं दिली आहे. या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथक करत आहे. जवळपास ३५ दिवसांनंतर जर्मनीवरून भारतात परतलेल्या प्रज्वल रेवण्णाला काल रात्री बंगळुरू विमानतळावरून विशेष तपास पथकानं अटक केली होती.

**<><><><><>**

स्वाती मलीवाल यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयानं मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे सहकारी बिभव कुमार यांना आज १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. तपास अद्याप प्राथमिक टप्प्यावर असून तो पूर्ण करण्यासाठी वेळ लागेल असं न्यायालयानं म्हटलं आहे. अतिरिक्त सरकारी वकील अतुल श्रीवास्तव यांनी योग्य तपास करण्यासाठी कुमार यांना न्यायालयीन कोठडी देण्याची मागणी करणारा अर्ज सादर केला होता. बिभव कुमार विरुद्ध १६ मे रोजी एफआयआर नोंदवण्यात आला. त्यानंतर कुमार यांनी

जामिनासाठी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. दिल्ली उच्च न्यायालयाने आज कुमार यांच्या जामीन याचिकेवरील निर्णय राखून ठेवला आहे.

<><><><><>

तंबाखू सेवनानं दरवर्षी देशात १३ लाख नागरिक मृत्युमुखी पडतात. त्यामुळे देशाच्या आरोग्य व्यवस्थेवर आर्थिक बोजा पडत असल्याचं केंद्रीय आरोग्य सचिव अपूर्व चंद्र यांनी सांगितलं. आजच्या जागतिक तंबाखू दिवसानिमित्त नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होतं. तंबाखू सेवन हे व्यक्तिगत आणि सामाजिक हानीकारक असल्याचं त्यांनी आपल्या भाषणात नमूद केलं.

तंबाखू सेवनावर नियंत्रणासाठी सरकारनं २०२४ मध्ये सिगारेट आणि अन्य तंबाखू उत्पादन अधिनियम-कोटापा २००३ लागू केला. त्याबरोबरच तंबाखूमुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांबाबत जनजागृतीसाठी अभियान चालवलं जात असल्याचंही चंद्र यांनी सांगितलं.

<><><><><>

छत्तीसगडमधे सुरक्षा दलांनी विजापूर जिल्ह्यातल्या विविध ठिकाणांहून सोळा माओवाद्यांना अटक केली आहे. यापैकी अकरा जणांना गोरना पडियारपारा परिसरातून, तर पाच जणांना भुसापूर परिसरातून अटक करण्यात आली. सुरक्षा दलांच्या हालचाली रोखण्यासाठी अडथळे निर्माण करणं आणि स्फोट घडवून आणणं अशा घटनांमध्ये सहभागाचा आरोप त्यांच्यावर असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

रेमाल चक्रीवादळानंतर झालेल्या मुसळधार पावसामुळे आसाम, मणिपूर, त्रिपुरा, मेघालय, मिझोरम या राज्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. आसाम मधल्या प्रमुख नद्यांची पाण्याची पातळी वाढली असून काही भाग जलमय झाला आहे. पुरात आतापर्यंत दोन जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं दिली आहे.

मणिपूरमध्ये, मुसळधार पावसामुळे इम्फाळ शहरात पुर आला आहे. पुरात आतापर्यंत तीन जणांचा मृत्यू झाला असून एक जण बेपत्ता आहे. इम्फाळ शहरातला सखल भाग आणि प्रमुख रस्ते जलमय झाले आहेत. इम्फाळमध्ये बचावकार्य सुरू असून सरकारने पूरग्रस्त कुटुंबांसाठी ५६ मदत शिबिरे उघडली आहेत.

दरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पूरस्थिती बाबत चिंता व्यक्त केली असून केंद्र सरकारकडून राज्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल असं समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

बँकॉकमध्ये सुरू असलेल्या जागतिक मुष्टियुद्ध स्पर्धेत मुष्टियोद्धा निशांत देवनं पुरुषांच्या ७१ किलो वजनी गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत विजय मिळवला आहे. त्यानं मोल्दोव्हाच्या सेबोटारीचा ५-० असा पराभव करून २०२४च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळवलं आहे. ऑलिम्पिक स्पर्धेत स्थान मिळवणारा तो सध्या एकमेव भारतीय पुरुष मुष्टियोद्धा आहे.

यापूर्वी निखत झरीन, प्रीती आणि लोव्हलिना बोरगोहेन या महिला मुष्टियोद्धांनी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळवलं आहे.

**<><><><><>**

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला दुहेरीत भारताच्या त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीनं उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात त्यांनी दक्षिण कोरियाच्या किम सो येओंग आणि काँग ही योंग या जोडीवर १८-२१, २१-१९, २४-२२ असा पराभव केला. एक तास १९ मिनिटं चाललेल्या या सामन्यात भारताच्या जोडीची सुरुवात अडखळत झाली आणि त्यांनी पहिला गेम गमावला. मात्र, जोरदार पुनरागमन करत त्रिशा आणि गायत्री यांनी उपांत्य फेरीत धडक मारली.

**<><><><><>**